# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक ०५.०५.२०२६ मंगळवार**

**१) गुन्हेशाखा युनिट ०४ पथकाची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक ०४.०५.२०२६ चे १६.०० वा. ते १८.०० वा. चे दरम्यान, युनिट क्र. ४ चे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत , आर्शिवाद नगर, प्लॉट नं. ८५५, साजीद अली यांचे घरी दुसऱ्या मजल्यावर किरायाने राहत असलेल्या ईसम गांजा बाळगुन आहेत. अशा प्राप्त खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे एका रूममध्ये तीन ईसम दिसून आले. पंचासमक्ष त्यांना त्यांचे नांव पत्ता विचारले असता, त्यांनी आपली नांवे १) मोहम्मद समीर वल्द मोहम्मद वजीरउद्दीन, वय ३४ वर्षे, रा. टोली चौकी, जमालीकुटा, पो. ठाणे गोलकुंडा, हैद्राबाद (तेलंगणा), २) शेख मोहम्मद जासीम वल्द शेख मोहम्मद अब्दुल्ला, वय ३४ वर्षे, रा. डी. ४११, मदीना तुअमन, सहारा हॉटेलचे समोर, कुर्ला वेस्ट, पो. ठाणे विनोबा भावे नगर, मुंबई ३) मोहम्मद अकबर बाबा वल्द मोहम्मद सरवर, वय १८ वर्षे, रा. सिकंदराबाद, ई.सी.आय.एल. दमाईगोंडा, पो. ठाणे कुसाईगुंडा, हैद्राबाद (तेलंगणा) असे सांगीतले. त्यांची व रूमची झडती घेतली असता, रूममध्ये एका पांढऱ्या—लाल रंगाचे प्लास्टीक थैलीमध्ये हिरवट काळसर फुले व फळे आलेला, उग्र वास येणारा अंमली पदार्थ गांजा एकुण वजनी ४३६५ ग्रॅम मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन गांजा, ४ मोबाईल फोन, ईलेक्ट्रीक वजन काटा, काळ्या रंगाच्या चिनी मातीच्या दोन चिलम व रोख ४०००/—रू. असा एकुण १,५४,०२५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींची सखोल विचारपूस केली असता, त्यांनी त्यांचे साथिदार पाहिजे आरोपी १) मोहम्मद जाहागिर बाबा अब्दुल कादर, रा. असलान्सर, सय्यदनगर, हैद्राबाद (तेलंगणा), २) अज्जु नावाचा ईसम, रा. किशन नगर झिरा, हैद्राबाद (तेलंगणा) याचे मदतीने गांजा आणल्याचे सांगीतले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), २०(ब)(ii)(अ), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सक्करदरा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह सक्करदरा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती नंदा मनगटे, पोउपनि. जितेशाचारी आरवेल्ली, सफौ. शेख

नाजीर, पोहवा सतीश ठाकरे, देवेंद्र नागरे, भगवतीकुमार ठाकुर, अभिषेक शनिवारे, पोअं. महेश काटवले, गोविंद देशमुख व चापोअं. श्रीकांत मारवाडे यांनी केली.



**<u>२) गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाची कामगिरी :—</u>**

दिनांक ०४.०१.२०२५ चे ०२.०० वा. ते ०३.०० चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत राहणारे ४८ वर्षीय फिर्यादी यांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही राहते घरी कोणाला काहीही न सांगता घरून निघुन गेली होती. ती घरी परत न आल्याने, तीचा शोध घेतला असता, ती मिळुन आली नाही. तीचे अल्पवयीन असल्याचा फायदा घेवुन, तीला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले. अशा फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे कलम १३७(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी नमुद गुन्ह्याचा सातत्याने पाठपुरावा करून, नमुद अल्पवयीन मुलीचा शोध घेणे सुरू होते. दरम्यान, तांत्रिक तपास करून व गुप्त बातमीदार मार्फतीने नमुद अपहृत मुलगी तासगाव, जि. सांगली (महाराष्ट्र) येथे असल्याचे निष्पन्न झाल्याने, दिनांक ०१.०५.२०२६ रोजी अपहृत मुलीचे शोधार्थ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाचे एक पथक पाठविले. तेथे मुलीचा शोध घेतला असता, माहिती प्राप्त झाली की, नमुद मुलगी ही बेळगाव (कर्नाटक) येथे असल्याचे समजले. त्यावरून, पथक परस्पर बेलगांव कर्नाटक येथे रवाना होवुन, तेथे ऑटो नगर येथे शोध घेतला असता, नमुद मुलगी ही एक संशयीत ईसम नामे पवन खलोदे याचेसोबत राहत असल्याचे दिसुन आले. दोघांनाही ताब्यात घेवुन त्यांची सविस्तर विचारपूस केली. मुलीचे समुपदेशन करण्यात आले. दोघांनाही पुढील कारवाईस्तव वाठोडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपुर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, मपोनि. ललीता तोडासे, पोहवा. सचिन श्रीरामे, पोअं. विलास चिंचूलकर व मपोअं. प्रिती थोटे यांनी केली.



**<u>३) वाडी पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक ०४.०५.२०२६ चे ११.५५ वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पाहिजे व फरार आरोपींचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नेक्सटेक्स गोडवून मागे, बंद घराचे तुटलेले कंपाऊंडचे भिंतीजवळ एक ईसम संशयीतरीत्या दिसून आल्याने त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळून जावू लागला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेवुन, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव विक्की जोकुराम गुप्ता, वय २६ वर्षे, रा. प्लॉट नं. ९४, गृहनिर्माण नागरीक सोसायटी, लावा, वाडी, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०३/२०२५, दिनांक २१.०६.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने संशयीतरीत्या समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. सतीषकुमार गुरव, सहा. पोलीस आयुक्त (एम.आय.डी.सी. विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. राजेश तटकरे व त्यांचे तपास पथकाने केली.

## (गुन्हे)

**<u>१) पोलीस ठाणे राणा प्रतापनगर :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०४.०५.२०२६ चे १९.२० वा. चे सुमारास, राणाप्रतापनगर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना जयताळा रोड, रिचार्ज बार समोर, नाईक ले—आऊट चे भिंतीजवळ सार्वजनिक ठिकाणी एक ईसम संशयीतरीत्या दिसून आल्याने, पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव आशिष किशोर राऊत, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. ०१, जोशी ले—आऊट, सुभाष नगर, राणा प्रतापनगर, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे खिश्यात एक जुना लोखंडी हत्तीमार चाकु किंमती ५००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे राणाप्रतापनगर येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, प्लॉट क्र. ५८, निर्मल कॉलोनी, गुप्ता किराणा स्टोअर्स जवळ, नारा रोड, नागपुर येथे राहणारे फिर्यादी निलेश श्यामलाल पुनेरीया, वय ४० वर्षे यांचे परिवारातील सदस्य लग्नसमारंभाकरीता बाहेरगावी गेले होते. दिनांक ०३.०५.२०२६ चे २२.०० वा. ते दिनांक ०४.०५.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांनी त्यांचे राहते घराचे खालच्या रूमचे दरवाज्याला कुलूप लावून वरच्या माळ्यावर झोपण्याकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे व मेन गेटचे कुलूप तोडून, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने किंमती २,९९,८००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यात्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे मपोउपनि. कौशल्या बाबर ९०९६६७६९३६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस. क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १६ वे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | १५८/१९९६ | कलम ८२ सी.आर.पी.सी. प्रमाणे | इंद्रपाल चिंतामण नितनवरे, वय १९ वर्षे, रा. फकीरावाडी, धंतोली, नागपूर. | १५.०५.२०२६ |
| २. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०४००१७ /२००१ | कलम ४२०, ४६८, ४७१, ३४ भा.दं.वि. | सौ. प्राप्ती नागेंद्र राव, रा. ६ वेलकम सोसायटी, झिंगाबाई टाकळी, मानकापुर, नागपूर, | २८.०५.२०२६ |
| ३. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०२, नागपुर. | ३०४०२५८ /१९९३ | कलम ३८० भा.दं.वि. | श्रीमती शोभा उर्फ शबाना विनोद हातांगडे, रा. पांढरा बोडी, पाण्याचे टाकीजवळ, नागपूर ह.मु. वंजारी नगर, पाण्याचे टाकीजवळ, झोपडपट्टी, नागपूर. | १२.०५.२०२६ |
| ४. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०२, नागपुर. | ३०४०१०८ /२००० | कलम ४५७, ३८० भा.दं. वि. | १) प्रेमसिंग किसनसिंग ठाकुर, वय ३२ वर्षे २) लखनसिंग किसनसिंग ठाकुर, वय २८ वर्षे ३) अमरसिंग किसनसिंग ठाकुर, वय ३३ वर्षे तिघेही रा. अयोध्या नगर ले–आऊट, सक्करदरा, नागपूर. ४) मुन्ना शंकर उईके, वय ३२ वर्षे, रा. भांडे ले– आऊट, नंदनवन, झोपडपट्टी ५) शालीक अशोक कोरडे, वय १९ वर्षे, रा. अयोध्या नगर, आदिवासी झोपडपट्टी, नागपूर. | १६.०५.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

# प्रसिध्दीपत्रक

## कारागृह पोलीस शिपाई भरती २०२४–२०२५ ''लेखी परीक्षे''बाबत उमेद्वारांना सुचना :–

पोलीस आयुक्तालय नागपूर शहर अंतर्गत कारागृह उपमहानिरीक्षक, पुर्व विभाग, नागपूर यांचे आस्थापनेवरील कारागृह पोलीस शिपाई भरती २०२४–२०२५ मधील कारागृह पोलीस शिपाई यांची एकुण १३० पदे भरणेबाबत पोलीस आयुक्त कार्यालय मार्फतीने दिनांक २८.१०.२०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरील पदांचे भरती प्रक्रीयेदरम्यान लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेद्वारांची लेखी परीक्षा ही नागपूर शहरातील **१) रायसोनी महाविद्यालय, मंगळवारी बाजार चौक, सदर, नागपूर, २) सेंट फ्रान्सीस डी सेल्स (एस.एफ.एस. महाविद्यालय), बालोद्यान गार्डन समोर, सेमिनिरी हिल्स, नागपूर अशा ०२ ठिकाणी दिनांक १०.०५.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजीत करण्यात आली आहे.** उमेद्वारांनी परीक्षा केंद्रावर सकाळी ०८.०० वा. उपस्थित राहावे. तसेच, सकाळी १०.०० वा. नंतर उशीरा हजर येणाऱ्या उमेद्वारांना परीक्षा केंद्राचे आंत प्रवेश दिला जाणार नाही.

उमेद्वारांकरीता लेखी परीक्षेबाबत सविस्तर सुचना www.nagpurpolice.gov.in या कार्यालयाचे संकेतस्थळावर व महा आयटी विभागाचे httts://policerecruitment2025.mahait.org या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली. आहे.

उमेद्वारांनी कारागृह पोलीस शिपाई या पदाच्या लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र httts://policerecruitment2025.mahait.org या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावेत. लेखी परीक्षेच्या प्रवेशपत्रा बाबत काही अडी–अडचणी असल्यास, कार्यालय पोलीस आयुक्त, नागपूर शहर येथे प्रत्यक्ष येवून संपर्क साधावा.

## लेखी परीक्षेकरीता पात्र उमेद्वारांना सर्वसाधारण सुचना :–

### करावे (Do's) :–

१) उमेद्वारांनी केंद्रावर प्रवेश करतांना त्यांचेजवळ मैदानी चाचणीचे वेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र व लेखी परीक्षेचे प्रवेश पत्र असे दोन्ही प्रवेशपत्र सोबत बाळगणे आवश्यक आहे. तसेच, स्वत:ची ओळख पटविण्याकरीता आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हींग लायसन्स), किंवा रंगीत फोटो असलेले ओळखपत्र यापैकी कोणतेही एक मुळ ओळखपत्र सोबत आणावी.

२) उमेद्वारांनी त्यांचे प्रवेश पत्रामध्ये नमुद केलेल्या फोटोच्या, पासपोर्ट साइज आकाराचे दोन प्रती सोबत बाळगणे आवश्यक आहे.

३) उमेद्वारांनी परीक्षा केंद्रावर आपले बायोमेट्रीक नोंदवावी.

४) उमेद्वारांनी सोबत आणलेली बॅग ही परीक्षा वर्गाच्या बाहेरच ठेवावी. त्यामधील वस्तु, सामानाची सर्वस्वी जबाबदारी ही उमेद्वाराची राहील.

५) उमेद्वारांना परीक्षा केंद्रावर दोन तासापुर्वी प्रवेश दिला असल्याने, त्यांनी ३० मिनीटांपुर्वी परीक्षा केंद्रातील वर्गामध्ये आपल्या आसन क्रमांकावर हजर राहावे.

६) लेखी परीक्षा सुरू असतांना कोणत्याही उमेद्वाराने परीक्षा केंद्राचे बाहेर जावु नये.

### करू नये (Dont's):–

१) उमेद्वारांना बॉल पेन व लेखनासाठी पॅड उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने, त्यांनी ईतर कोणतीही वस्तु उदा. पेन, पेन्सील, खोडरबर परीक्षा केंद्रावर सोबत बाळगु नये.

२) परीक्षा केंद्रावर भ्रमणध्वनी, डिजीटल डायरी, मायक्रोफोन, मायक्रो कॅमेरा डिवाईस, कॅलक्युलेटर, डिजीटल नोटपॅड, ईअरफोन, हिअरींग ॲड डिवाईस, स्मार्ट वॉच, स्मार्ट आयग्लास, बटन कॅमेरा, पेन कॅमेरा व नोट्स पुस्तके इ. साहित्य आणण्यास सक्त मनाई आहे.

**स्वा/—**
**( वसंत परदेशी )**
**अप्पर पोलीस आयुक्त,**
**गुन्हे, नागपुर शहर.**